**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, NOV-DEC, 2021, VOL- 9/68*

# व्यक्ति अभ्यास : एक परिपूर्ण संशोधन पध्दती

**अर्चना ज्ञानोबा अडसुळे**
सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ , पुणे
**डॉ. अतुल प्रकाश कुलकर्णी**
विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग,
म. ए. सो.आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे

**Paper Received On:** 21 DEC 2021
**Peer Reviewed On:** 31 DEC 2021
**Published On:** 1 JAN 2022

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना -**

व्यक्ती अभ्यास पद्धतीचा सर्वप्रथम उपयोग हर्बर्ट स्पेन्सर या इंग्रज समाजशास्त्रज्ञाने केला. हर्बर्ट स्पेन्सर यांनी वेगवेगळ्या संस्कृतीचा तुलनात्मक अध्ययनात व्यक्ती सामग्रीचा सर्वप्रथम उपयोग केला. परंतु विशिष्ट पद्धतीचा व्यवस्थित स्वरूपात उपयोग फ्रेडरिक लेप्ले यांनी केला म्हणून सामाजिक शास्त्रात व्यक्ती अभ्यास पद्धती आणण्याचे श्रेय लेप्ले यांना दिले जाते. त्यांनी 19 व्या शतकात फ्रान्समधील मजूर कुटुंबाचे अध्ययन या पध्दतीद्वारे केले. त्यानंतर विल्यम हिले यांनी व्यक्ती अभ्यास पद्धतीचा उपयोग बालगुन्हेगारीच्या अध्ययनात केला.

**व्याख्या :**

A case study is an empirical enquiry that

- investigates a contemporary phenomenon in depth and within its real-life context, especially when
- The boundaries between phenomenon and context are not clearly evident.

"A comprehensive study of a social unit be that unit a person, a group, a social institution, a district or a community is called a case study." - P.V. Young.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

"एखाद्या सामाजिक घटकाचा सर्वसमावेशक असा अभ्यास म्हणजे व्यक्ति-अभ्यास होय. तो सामाजिक घटक एखादी व्यक्ती असेल, एखादा गट असेल, एखादी सामाजिक संस्था असेल, एखादा जिल्हा असेल किंवा एखादा समाज असेल."

"Case study method is a form of qualitative analysis involving the very careful and complete observation of a person, a situation or an institution." - Biesanz and Biesanz

"व्यक्ती अभ्यास गुणात्मक विश्लेषणाचे एक रुप आहे ज्यामध्ये कोणतीही व्यक्ती , परिस्थिती किंवा संस्थाचे अत्यंत काळजीपूर्वक आणि संपूर्ण निरीक्षण केले जाते." - बिंसंज आणि बिंसंज

➢ **व्यक्ती अध्ययनाची वैशिष्ट्ये**

**1. एक किंवा अधिक सामाजिक एककाचे अध्ययन**

व्यक्ती अध्ययनात एक किंवा एकापेक्षा अधिक निवडक अशा एककाचे अध्ययन केले जाते. हे एकक एखादी व्यक्ती, कुटुंब, संस्था, समूह किंवा समुदाय असू शकते.

**2. समस्याचे सखोल अध्ययन**

व्यक्ती अध्ययनात समस्येच्या संबंधित एककांचे सखोल अध्ययन बराच काळापर्यंत करण्यात येते. कारण त्यामध्ये एककाचे भूतकालीन म्हणजेच त्याच्या उत्पत्तीपासून तर वर्तमान परिस्थितीपर्यंत अध्ययन करणे अनिवार्य असते.

**3. व्यक्तिगत अध्ययन**

व्यक्ती अध्ययनात व्यक्ती , कुटुंब , संस्था , समूह किंवा इतर कोणत्याही एककाचे व्यक्तिगत स्तरावर संपूर्ण अध्ययन करण्यात येते.

**4. एककाचे संपूर्ण अध्ययन**

यामध्ये एककाच्या पैलू किंवा त्या पैलूंना घेऊन सर्व गोष्टींचे अध्ययन केले जाते.

**5. ऐतिहासिक अध्ययन**

व्यक्ती अध्ययनात एकाकाची भूतकालीन उत्पत्ती व वर्तमानकालीन स्थिती यांचाही अभ्यास केला जातो. ऐतिहासिक अध्ययनामुळे त्या एककाच्या वर्तमानावर कोणता परिणाम झाला हे लक्षात येते.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**6. गुणात्मक अध्ययन**

व्यक्ती अध्ययन पद्धतीत गुणात्मक अध्ययन असतेच पण तथ्यांचे विश्लेषणही गुणात्मक असते. निष्कर्ष काढण्यासाठी संख्यात्मक सामग्रीचा आधार घेतला जात नाही. या पद्धती वर्णनात्मक विश्लेषण प्रस्तुत केले जाते.

**7. मानवी व्यवहारांच्या कारणांचा शोध**

ह्या पद्धतीत ज्या एककाचा अभ्यास करावयाचा असेल त्या संबंधित मानवी व्यवहारांच्या कारणांचा शोध घेतला जातो. ही शोधण्याची पद्धती सहज व प्रत्यक्ष स्वरूपाची असते. यासाठी संशोधक व्यक्ती अभ्यासासंबंधीत व्यक्तीने निर्माण केलेल्या व त्या व्यक्तीसंबंधित असलेली कागदपत्रे, रोजनिशी पत्रे, आत्मचरित्रे इत्यादींचा आधार तो घेतो आणि कार्यकारण संबंधाचा शोध घेतो.

➢ **व्यक्ती अध्ययनाचे प्रकार**

**1. व्यक्तीचा व्यक्ती अभ्यास**

या प्रकारात व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित सर्व घटनांचा अभ्यास केला जातो. या अभ्यासात अनेक स्त्रोत वापरून माहिती प्राप्त केली जाते. ज्यात कुटुंब, सदस्य, मित्र परिवार, शेजार गट, सहअध्यायी, व्यक्तीला ओळखणाऱ्या व्यक्ती, पत्रव्यवहार, दैनंदिनी, आत्मकथा, आठवणी, अनेक लिखित स्त्रोतांद्वारे माहिती प्राप्त केली जाते. या प्रकाराच्या अध्ययनातही व्यक्ती जीवनाच्या अध्ययनात सहाय्यभूत ठरणारी साधनेच वापरली जातात.

**2. समुदायाचा व्यक्ती अभ्यास**

या प्रकारात एखाद्या समूह, संस्था, समुदायाचे सूक्ष्म, सखोल अध्ययन केले जाते. यामध्ये एखादा वर्ग, धर्म, जाती, सांस्कृतिक समूहाचे अध्ययन केले जाते. या प्रकारच्या अध्ययनातही व्यक्तीजीवनाच्या अध्ययनास सहाय्यभूत ठरणारी साधनेच माहिती मिळविण्याकरिता उपयोगात आणली जातात. व्यक्ती अभ्यास पध्दतीद्वारे समुदायाच्या एखाद्या एककाच्या संदर्भातील स्थितीचे विस्तृत स्वरूपाचे ज्ञान प्राप्त होते. या पध्दतीद्वारा अभ्यास करताना संशोधकांकडे अत्याधिक बुध्दिकौशल्य व अनुभवाची आवश्यकता भासते.

➢ **व्यक्ती अभ्यास पध्दतीचे महत्त्व**

व्यक्ती अभ्यासाद्वारे संशोधन समस्येचे अत्यंत सूक्ष्म व गहन अभ्यास केला जात असल्यामुळे सामाजिक संशोधनात व्यावहारिक पातळीवर ही पध्दती अत्यंत उपयुक्त आहे.

1. संशोधनास घेतलेल्या एककाचे अत्यंत सूक्ष्म व गहन अध्ययन केले जाते.
2. एककाच्या विशिष्ट पैलूंचाचअभ्यास न करता एककाच्या सर्वच पैलूंचा समग्र अभ्यास केला जातो.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

3. या अभ्यासामूळे उपयुक्त स्वरूपाच्या गृहीतकृत्य निर्मितीला सहाय्यता मिळते.
4. विभिन्न एककांना विभिन्न समूहामध्ये वर्गीकृत करण्यामध्ये सहाय्यभूत ठरते.
5. या अभ्यासामध्ये प्रश्नावली, अनुसूची, निरीक्षण व मुलाखती ही साधने असू शकतात.
6. या अभ्यासात संशोधकास अध्ययनासंबंधी विभिन्न अशा पैलूंचे विश्लेषण करण्याची अंतर्दृष्टी प्राप्त होते.
7. मानसोपचार तज्ञ व्यक्तीच्या मानसिक अवस्थेची चिकित्सा किंवा अध्ययन करण्याकरिता व्यक्ती अभ्यास पध्दतीचा अधिकाधिक उपयोग करतात.
8. संशोधक अध्ययन एककाच्या भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळा संबंधित माहिती जाणून घेऊन त्या माहितीत समन्वय साधून त्याद्वारा निष्कर्ष काढण्यात यशस्वी होऊ शकतो.

➢ **व्यक्ती अभ्यास पध्दतीच्या माहिती संकलनाचे तंत्र व स्त्रोत**

व्यक्ती अभ्यासात तथ्य संकलनाकरिता अनेक तंत्र व स्त्रोतांचा उपयोग केला जातो. निरीक्षण व मुलाखत या प्राथमिक आणि पुस्तक, पत्रे, दैनंदिनी, शासकीय रेकॉड या व्दितीय स्त्रोतांचा वापर व्यक्ती अभ्यासातकेला जातो. त्यामळे या अध्ययनाद्वारा जास्तीत जास्त माहिती संकलित केली जाते.

**1. रोजनिशी**

व्यक्तीच्या दैनंदिन जीवनासंबंधीची माहिती रोजनिशीद्वारे माहिती होऊ शकते. एककाला त्याच्या जीवनात मिळालेले यश-अपयश, गुप्त स्वरूपाच्या बाबी केवळ रोजनिशीमधूनच समजू शकत असल्याने व्यक्ती अभ्यासात रोजनिशीला अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

**2. पत्रव्यवहार**

पत्राद्वारे व्यक्ती आपल्या भावभावनांचे विचारांचे अदान-प्रदान करत असते. ज्याद्वारे व्यक्तीच्या मानशास्त्रीय अवस्थांचे अध्ययन करणे शक्य होऊ शकते. या साधनाद्वारे व्यक्तीचे इतर व्यक्तीशी असलेला संबंध, सामाजिक जीवनासंबंधीचा दृष्टिकोन, त्यांचे वैयक्तिक अनुभव इत्यादीचे ज्ञान संशोधकाला होऊ शकते.

**3. कागदपत्रे**

व्यक्ती अभ्यासात प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रांनाही विशेष महत्व आहे. कागदपत्रे आणि मासिके तसेच अप्रकाशित स्वरूपाच्या नोंदीतूनही माहिती प्राप्त केली जाते. या कागदपत्रांच्या माध्यमातून समाज जीवनातील किंवा व्यक्ती जीवनातील विविध घटना व अनुभवांना जाणून घेता येते.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**4. जीवन इतिहास**

या साधनाद्वारे व्यक्ती व समाजजीवनाचे संपूर्ण चित्र संशोधकाच्या नजरेसमोर येऊ शकते. जीवनइतिहासात व्यक्तीच्या कौटुंबिक पार्श्वभूमीची माहिती होऊन कुटुंबाअंतर्गत घडलेल्या महत्वपूर्ण घटनांद्वारा व्यक्तीचे जीवन कसे प्रभावित किंवा परिवर्तित झाले व व्यक्तीमत्व विकासात कसे सहाय्यभूत झाले याचे ज्ञान प्राप्त होते. जीवन इतिहासात या प्रतिक्रियांचेही विश्लेषण करणे आवश्यक ठरते.

**5. इतर संकलित सामग्री**

शासकिय व अशासकिय संस्थाद्वारा संकलित सामग्रीद्वारेही माहिती संकलित केली जाते. यात शासकीय कार्यालयाची कागदपत्रे, वंशावळ, शाळा, पोलिस यंत्रणा, न्यायालय तुरूंग इत्यादी कागदपत्रे, पुस्तके, फोटो, जनगणनेची कागदपत्रे इत्यादी द्वाराही माहिती प्राप्त केली जाते.

**समारोप -** व्यक्ती अभ्यास पद्धती ही गुणात्मक पद्धती असून यात अध्ययन एकक व्यक्ती असो, गट असो किंवा सामाजिक संस्था वा एखादा समुदाय असो, त्या अध्ययन एककाचे सांगोपांग वा परिपूर्ण असे अध्ययन केले जाते.

**संदर्भ**

भिंताडे, वि. रा. (2005) **शैक्षणिक संशोधन पद्धती**, पुणे : नूतन प्रकाशन.

कऱ्हाडे, बी. एम. (जून 2011) **शास्त्रीय संशोधनाची पद्धती**, तिसरी आवृत्ती, नागपूरः पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.

खैरनार, दिलीप (मार्च 2011) **प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी**, द्वितीय आवृत्ती, पुणे : डायमंड प्रकाशन.

पाटील, वा. भा. (2012) **संशोधन पद्धत्ती**, द्वितीय आवृत्ती, जळगांव : प्रशांत पब्लिकेशन.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*